स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा.
(Synopsis)

संशोधन विषय

"राम वाघमारे यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास"

संशोधक
आशा विठ्ठलराव संगेवार
(एम.ए.मराठी, बी.एड,)

मार्गदर्शक
प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यशवंते
(सह्योगी प्राध्यापक मराठी विभाग)
श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा
ता.पूर्णा जि.परभणी

संशोधन केंद्र
मराठी विभाग
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

ऑगस्ट - २०२३

"राम वाघमारे यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना :

लेखक हा समाजातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. लेखक कौशल्यपूर्वक भाषेचा वापर करून साहित्य निर्माण करतात. आपल्या विचारातून व काल्पनिक प्रतिमेतून आपले मत लोक मनापर्यंत पोहोचवितात. आपल्या लेखणीतून जगाची माहिती देण्याचे, समाज जागविण्याचे, प्रेरित करण्याचे काम करतात. सुरुवातीच्या काळापासूनचा विचार करता संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम यांनी तर समाज स्थिती ओळखून समाज जागविण्याची गरज ओळखून कार्य केले. त्यांच्याच प्रेरणेने अनेक लेखकांनी साहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारातून लिखाण केलेली दिसते.

महात्मा फुले, ताराबाई शिंदे, लोकहितवादी, आगरकर त्याचप्रमाणे चिपळूणकर, ह.ना. आपटे, केशवसुत, दिवाकर कृष्ण, भालचंद्र नेमाडे रंगनाथ पठारे, कुसुमाग्रज इत्यादी विविध कालखंडातील लेखकांच्या लेखणीतून कोलमडलेल्या समाज दाखविण्याची व समाज जागविण्याची गरज ओळखलेली दिसून येते. त्यांचीच प्रेरणा घेऊन आजचे नवोदित लेखक राम वाघमारे यांचे साहित्यही याच परंपराची वाटचाल करणारे दिसते.

पुण्याचा साहित्यरत्न पुरस्कार जाहीर झालेले साहित्यिक राम वाघमारे हे नांदेडचे रहिवासी फाइट फॉर द राईट हा बहुचर्चित कादंबरीला पुरस्कार जाहीर झाला आहे. राम वाघमारे यांचे डोन्ट वरी सर हा कथासंग्रह तर खेळ, ग्रॅपल, लढा, गुरुजींची शाळा, फाइट फॉर द राईट इत्यादी कादंबऱ्या प्रकाशझोतात आहेत.

दीपस्तंभ, ऊर्जा स्त्रोत, अक्का कोहिनूर- ए- गझल इलाही इत्यादी चरित्रात्मक पुस्तके प्रकाशित आहेत. काकांच्या शैक्षणिक गप्पा, समकालीन कादंबरीकार भालचंद्र नेमाडे व रंगनाथ पठारे हा समीक्षा ग्रंथ ही प्रसिद्धीत आहे. त्यांनी काळ्या व 98% या शैक्षणिक लघु चित्रपटाची ही निर्मिती केली आहे.

राम वाघमारे हे श्री शारदा भवन संस्थेच्या महात्मा फुले हायस्कूल, बाबा नगर, नांदेड येथे मराठी विषयाचे सहशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.

साहित्य हे समाज मन व लोक मनाचा आरसा असतो आणि हाच आरसा आपल्या साहित्यातून दाखविण्याचा प्रयत्न राम वाघमारे यांनी केलेला दिसतोय साहित्यातील त्यांची भाषाशैली अगदी साधी सरळ सोपी प्रत्येकाला जवळची वाटणारी अशी आहे त्यांनी आपल्या चरित्रात्मक पुस्तकातून असामान्य लोकांचे व्यक्तिमत्व व असामान्य असे कर्तुत्व दाखवून दिले शैक्षणिक हित जोपासण्यासाठी व समाजाचा शैक्षणिक विकास करण्यासाठी याबाबतचे त्यांचे शैक्षणिक विचार आपल्याला मोलाचे

मार्गदर्शक ठरतात समाजित व काळाची गरज ओळखता या नवोदित लेखकाने आपल्या साहित्यातून समाजमनात मानाचा तुरा रोवला आहे.

संशोधन विषयी निवडी मागील भूमिका :

मागील दोन-तीन वर्षाचा विचार करता जागतिकीकरणात तांत्रिक युगात शिरकाव करणारा समाज कोरोना सारख्या आजारामुळे हतबल व निराश झाला होता. प्रगती करण्याच्या हेतूने वेगवेगळ्या कारणासाठी तो आपल्याच माणसापासून दूर गेलेला मनाने जवळीकता साधू लागला. सभोवतालच्या रोगिष्ट वातावरणात आपली व आपल्या आप्तस्वकीयांची आरोग्य, मन ताजी व टवटवीत ठेवण्याचा प्रयत्न करू लागला. यातूनच शारीरिक स्वास्थ्यासाठी योगाची व मानसिक बौद्धिक स्वास्थ्यासाठी वाचनाची सवय लावू लागला. मग कथा, कादंबरी, कविता, नाटक कोणताही साहित्यप्रकार असो तो अगदी चरित्रात्मक पुस्तके ही तो निहाळू लागला. यातून समाज मानवाला जगण्याची उमेद मिळू लागले.

राम वाघमारे यांच्या साहित्यकृतीने ही इतरांप्रमाणे माझ्या मनावरही भुरळ घातली. त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त झालेले चित्रण मला जवळची वाटू लागले. त्यांच्या लिखाणाची साधी सरळ भाषा शैली त्यांना वाटणारी शैक्षणिक क्षेत्राबाबतची तळमळ त्यांच्या लिखाणातून वाहताना दिसली. राम वाघमारे यांनी आपल्या चरित्रात्मक कादंबरीतून जीवनात खऱ्यासाठी संघर्ष करणाऱ्या नायकाची जीवन कार्य कर्तृत्व उजागर करण्याचा प्रयत्न केला आहे. अशा चरित्रात्मक पुस्तकाची गरज समाजाला आहे अक्का सारख्या पुस्तक तर प्रत्येक मातेसाठी व पालकांसाठी प्रेरणादायी दिशादर्शक ठरेल तळागाळातील माणसाचा जीवन प्रवाह किती आव्हानात्मक असतो हे आव्हान स्वीकारून दलित्वाची लपेटलेली प्रावरणे झुगारून समर्थपणे अस्तित्व निर्माण करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा शोध राम वाघमारे यांनी घेतलेला दिसतोय. समाजातील बदलत जाणाऱ्या जाणिवा समाज जीवनात चालणाऱ्या अखंड संघर्षाचा शोध त्यांच्या साहित्यातून प्रकटताना दिसतात. प्रसिद्धीपासून दूर असलेले आयुष्यात आभाळाएवढं दुःख असले तरी इतरांचे आयुष्य गजलद्वारे फुलवणारे व्यक्तिमत्व राम वाघमारे यांनी समाजासमोर आणण्याचा प्रयत्न केला आहे.

राम वाघमारे यांच्या साहित्यात वेगवेगळी व्यक्तिमत्व फुलवणारे, अनोखा सामाजिक जाणीव अनुभव असणारे व्यक्ती, त्यांचे लोकजीवन कशाप्रकारे प्रकटले ? समाजातील बदलत जाणाऱ्या वृत्ती- प्रवृत्तीचा वेध त्यांनी त्यांच्या साहित्यात कशाप्रकारे घेतला, या यांत्रिक व जागतिक युगात त्यांचे लिखाण साहित्य वेगळे कसे ठरले? या सर्व प्रश्नांचा शोध घेणे गरजेची वाटल्यामुळे व त्यांच्या साहित्यातील सूक्ष्मता, संवादात्मकता,

विद्यार्थ्यांच्या भविष्याची चिंता, शैक्षणिक व सामाजिक जाणीव कशाप्रकारे त्यांच्या साहित्यातून उमटल्या? यांचा शोध घेणे आवश्यक वाटल्यामुळे मी राम वाघमारे यांच्या साहित्याचा अभ्यास हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

प्रबंध विषयाचे स्वरूप :

प्रस्तुत प्रबंधात राम वाघमारे यांच्या साहित्याचा अभ्यास मांडला आहे. या विषयाची व्याप्ती ठरविण्यासाठी विषयासाठी प्रबंधात राम वाघमारे यांच्या साहित्याची म्हणजेच कथा, कादंबरी, चरित्र ग्रंथ, शैक्षणिक विचार, समीक्षा ग्रंथ यांची प्रकरण निहाय मांडणी केली आहे.

संशोधनाचे उद्देश :

" राम वाघमारे यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास" या विषयाच्या अनुषंगाने संशोधन कार्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण उद्देश निश्चित केले आहे ते पुढील प्रमाणे -

1. राम वाघमारे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्वाची माहिती घेणे.
2. राम वाघमारे यांच्या साहित्याचे स्वरूप पाहणे.
3. राम वाघमारे यांच्या साहित्यातील सर्वांगीण परिस्थितीचा अभ्यास करणे.
4. राम वाघमारे यांच्या साहित्यातील भाषाशैलीचा अभ्यास करणे.
5. राम वाघमारे यांच्या साहित्यातील समाजजीवनातील दुःख, व्यथा, वेदना, रूढी - परंपरा यांचा शोध घेणे.
6. राम वाघमारे यांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन करणे.
7. राम वाघमारे यांच्या साहित्याचे सामाजिक दृष्टीने महत्त्व पाहणे.
8. राम वाघमारे यांच्या साहित्यातून प्रकट झालेले भावभावनांचा व स्वभावांचा शोध घेणे.

संशोधन अभ्यास पद्धत :

संशोधन करत असताना संशोधन अभ्यास पद्धत ही खूप महत्त्वाची असते. कारण त्याच आधारे आपण संशोधन व्यवस्थित व चांगल्या रीती करू शकतो. समाज जीवनातील संघर्ष, व्यक्तिमत्वाचे असलेले विविध पैलू, दुःख, वेदना, सामान्य पासून असामान्य पर्यंत पोहोचलेला प्रवास, समकालीन साहित्यकांचे समीक्षा ग्रंथातून टिपलेली वेगळेपण या सर्वांचे वास्तव दर्शन राम वाघमारे यांच्या साहित्यातून घडते. म्हणून मी

“राम वाघमारे यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास” या विषयाचा अभ्यासाकरिता वर्णनात्मक, चिंतनात्मक, समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, विश्लेषणात्मक, निरीक्षणात्मक या संशोधन पद्धतीचा अवलंब करणार आहे व दुय्यम साधनात संदर्भग्रंथ, नियतकालिके, वाङ्मयीन साप्ताहिके, साहित्यिकांची मते व विषयाच्या अनुषंगाने आलेल्या माहितेचे संकलन करून त्या द्वारे संशोधक विश्लेषण करणार आहे.

संशोधनाची गृहीतकृत्ये :

संशोधनासाठी गृहीतकृत्याची आवश्यकता आहे. त्यामुळे संशोधनाला दिशा प्राप्त होते. म्हणून प्रस्तुत संशोधन कार्यासाठी उपयुक्त असलेली गृहितके पुढील प्रमाणे :

1. राम वाघमारे यांच्या निवडक साहित्यातून जीवन संघर्ष दिसून येतो.
2. राम वाघमारे यांच्या साहित्यात व्यक्तीविशेष दिसून येतात.
3. राम वाघमारे यांच्या सभोवतालच्या सर्वांगीण परिस्थितीचा व्यक्तिमत्त्वावर प्रभावी परिणाम दिसून येतो.

प्रकरण योजना :

“राम वाघमारे यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास” या विषयावरील शोध प्रबंध लेखनाची प्रकरणे पुढील प्रमाणे :

1. राम वाघमारे यांचे व्यक्तिमत्व.
2. राम वाघमारे यांच्या कथासंग्रहाचा अभ्यास.
3. राम वाघमारे यांच्या कादंबरीचा अभ्यास.
4. राम वाघमारे यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथांचे अध्ययन
5. राम वाघमारे यांच्या साहित्यातील शैक्षणिक घडामोडींचा अभ्यास.
6. राम वाघमारे यांच्या समीक्षाग्रंथाचा आढावा.
7. राम वाघमारे यांच्या साहित्याची भाषाशैली
8. राम वाघमारे यांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन
9. उपसंहार

प्रकरणाचा संक्षिप्त आराखडा:

प्रकरण पहिले - राम वाघमारे यांचे व्यक्तिमत्व.

1. प्रस्तावना
2. राम वाघमारे यांचा परिचय
3. राम वाघमारे यांच्या वाङ्मय व्यक्तिमत्त्वाची जडणघडण
4. राम वाघमारे यांचे साहित्य विश्व
    1) कथालेखन
    2) कादंबरी लेखन
    3) चरित्र लेखन
    4) शैक्षणिक विचार
    5) समीक्षा ग्रंथ
5. राम वाघमारे यांच्या साहित्य निर्मितीमागील प्रेरणा
6. राम वाघमारे यांच्या साहित्याची वैशिष्ट्ये
7. समारोप

प्रकरण दुसरे : राम वाघमारे यांच्या कथासंग्रहांचा अभ्यास.

1. प्रस्तावना
2. राम वाघमारे यांच्या कथेचा आशय
3. राम वाघमारे यांच्या डोन्ट वरी सर या कथासंग्रहातील कथाविश्व व आशय
    1. डोन्ट वरी सर
    2. एवढा निरोप सांगा.
    3. हिशोब.
    4. मायची कथा न्यारीच.
    5. नातं रक्ताचं
    6. हसावं की रडावं?
    7 उज्वल भविष्यासाठी
    8. भीम जयंती
    9. लग्नानंतरचं लग्न
4. राम वाघमारे यांच्या कथेतील समाजव्यवस्था

5. राम वाघमारे यांच्या कथेतील व्यक्तिरेखा
6. राम वाघमारे यांच्या कथेची भाषाशैली
7. राम वाघमारे यांच्या कथा लेखन विशेष
8. समारोप

प्रकरण तिसरे : राम वाघमारे यांच्या कादंबरीचा अभ्यास.

1. प्रस्तावना
2. कादंबरीचा आतापर्यंतचा विकास
3. राम वाघमारे यांचे कादंबरी वाङ्मय
4. खेळ मधील आशय विशेष
5. गुरुजींची शाळा मधील आशय विशेष
6. राम वाघमारे यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा-
    1. खेळ मधील व्यक्तिरेखा
    2. गुरुजींची शाळा मधील व्यक्तिरेखा
7. राम वाघमारे यांचे चरित्रात्मक कादंबरी -
    1. चरित्रात्मक कादंबरी विशेष
    2. लढा आणि फाइट फॉर द राईट या चरित्रात्मक कादंबरी
8. राम वाघमारे यांच्या कादंबरी वाङ्मयातील वातावरण निर्मिती-
    1. गुरुजींची शाळा
    2. खेळ
    3. लढा
    4. फाईट फॉर द राईट
9. राम वाघमारे यांच्या कादंबरी वाङ्मयाची भाषाशैली
10. समारोप

प्रकरण चौथे : राम वाघमारे यांनी लिहिलेल्या चरित्रग्रंथांचे अध्ययन.

1. प्रस्तावना
2. राम वाघमारे यांचे चरित्र ग्रंथ
    1. अक्का नागरबाई टाकसाळ
    2. कोहिनूर ए गझल इलाही
3. राम वाघमारे यांच्या चरित्र ग्रंथातील व्यक्तिमत्व

4. राम वाघमारे यांच्या चरित्र ग्रंथाची वैशिष्ट्ये आणि भाषाशैली
5. समारोप

प्रकरण पाचवे : राम वाघमारे यांच्या साहित्यातील शैक्षणिक घडामोडींचा अभ्यास.

1. प्रस्तावना
2. शैक्षणिक घडामोडींचे स्वरूप
3. राम वाघमारे यांची 'काकांच्या शैक्षणिक गप्पा' लिहिण्यामागची भूमिका
4. समारोप

प्रकरण सहावे : राम वाघमारे यांच्या समीक्षाग्रंथांचा आढावा.

1. प्रस्तावना -
2. समीक्षा ग्रंथ : स्वरूप व कार्यपद्धती
3. राम वाघमारे यांचा समीक्षा ग्रंथ : समकालीन कादंबरीकार भालचंद्र नेमाडे व रंगनाथ पठारे
4. राम वाघमारे यांनी समीक्षा ग्रंथात रेखाटलेले जीवन अनुभव
5. समीक्षा ग्रंथाची वैशिष्ट्ये
6. समारोप

प्रकरण सातवे : राम वाघमारे यांच्या साहित्याची भाषाशैली

1. प्रस्तावना
2. भाषाशैलीतील वेगळेपण
    1) बोलीतील शब्द
3. राम वाघमारे यांचा लेख संग्रह
4. समारोप

प्रकरण आठवे : राम वाघमारे यांच्या साहित्याचे वाङ्मयीन मूल्यमापन

1. प्रस्तावना
2. राम वाघमारे यांच्या साहित्याचा आशय
3. राम वाघमारे यांच्या साहित्यातील वास्तविकता

4. राम वाघमारे यांच्या साहित्यातून जाणवणारे अनुभवविश्व
5. राम वाघमारे यांच्या साहित्यातील स्त्री व्यक्तिरेखा व पुरुष व्यक्तिरेखा
6. समारोप

प्रकरण नववे : उपसंहार

1. प्रस्तावना
2. उपसंहार
3. निष्कर्ष व निरीक्षणे

परिशिष्टे :

1. राम वाघमारे यांचा जीवनपट
2. राम वाघमारे यांचे छायाचित्र
3. राम वाघमारे यांचे हस्ताक्षर
4. राम वाघमारे यांच्या साहित्यकृतीची मुखपृष्ठे
5. राम वाघमारे यांच्या साहित्यकृतीची मलपृष्ठे

आधारभूत संदर्भ साहित्य :

1. कथासंग्रह
   डोन्ट वरी सर
2. कादंबरी
   1. खेळ
   2. गुरुजींची शाळा
   3. लढा
   4. फाइट फॉर द राईट
3. चरित्र ग्रंथ
   1. अक्का- नागरबाई टाकसाळ
   2. कोहिनूर ये गझल इलाही
4. शैक्षणिक विचार
   1. – काकांच्या शैक्षणिक गप्पा
5. समीक्षा ग्रंथ
   1.समकालीन कादंबरीकार भालचंद्र नेमाडे व रंगनाथ पठारे

(टीप : प्रस्तुत संशोधनाच्या रूपरेषेमध्ये संशोधनाअंती थोडाफार बदल होण्याची शक्यता आहे.)

संशोधक

आशा विठ्ठलराव संगेवार

(एम.ए.मराठी, बी.एड.)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यशवंते

(सहयोगी प्राध्यापक मराठी विभाग)

श्री गुरु बुद्धीस्वामी महाविद्यालय, पूर्णा

ता.पूर्णा जि.परभणी